आकाशवाणी नागपूर,

प्रादेशिक वृत्त विभाग

प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)

गुरुवार दिनांक १४ नोव्हेंबर २०२४

ठळक बातम्या

- भाजप आरक्षण विरोधी असल्याचा अपप्रचार विरोधी पक्षांकडून केला जात असल्याची पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची छत्रपती संभाजीनगर येथील जाहीर सभेत टीका.
- केंद्र सरकार आदिवासी समुदायाला संसाधनापासून दूर ठेवत असल्याचा राहुल गांधी यांचा नंदुरबारच्या प्रचारसभेत आरोप.
- नागपूरसह विदर्भात सर्वपक्षीय प्रचार सभांचा धडाका; आश्वासनं, टीका, आरोप - प्रत्यारोपांना उधाण.
- आज आणि उद्या नागपूर जिल्ह्यातील बारा विधानसभा मतदारसंघातील एकूण तीन हजार ४३७ मतदार बजावत आहे गृहमतदानाचा हक्क.

मोदी सभा - सांभाजीनगर

भाजप आरक्षण विरोधी असल्याचा अपप्रचार विरोधी पक्षांकडून केला जात आहे, मात्र काँग्रेस पक्षाची भुमिका कायम आरक्षण विरोधी राहिली असल्याची टीका केला, ज्येष्ठ भाजप नेते आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केली आहे. छत्रपती संभाजीनगर आणि जालना जिल्ह्यातल्या महायुतीच्या उमेदवारांसाठी चिखलठाणा इथं झालेल्या जाहीर सभेत ते आज बोलत होते. जलयुक्त शिवार योजनेमुळे मराठवाड्यातलं जलसंकट दूर झाल्याचं तसेच अनेक वर्षांपासून या भागात असलेला दुष्काळ दूर करण्यासाठी महायुती सरकारनं ठोस उपाययोजना करण्यास सुरुवात केल्याचं मोदी यांनी सांगितलं. महायुतीचं सरकार पुन्हा आल्यास पुढील पाच वर्षात महाराष्ट्र विकासाची नवी क्षितीजं पादाक्रांत करेल, असं सांगून मोदी यांनी महायुती सरकार राबवत असलेल्या विविध योजनांचा आपल्या भाषणात उल्लेख केला. शिवसेना नेते आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्ष रामदास आठवले, यांच्यासह महायुतीचे इतर नेते आणि उमेदवार यावेळी उपस्थित होते.

राहुल गांधी सभा

केंद्र सरकारच्या धोरणा निर्मितीत आदिवासी अधिकाऱ्यांना मर्यादित अधिकार असून आदिवासी समुदायाला संसाधनापासून दूर ठेवलं जातं, असा आरोप काँग्रेसचे ज्येष्ठ नेते राहुल गांधी यांनी केला. ते आज नंदुरबार इथं प्रचारसभेत बोलत होते. देशात आदिवासींची लोकसंख्या ८ टक्के आहे, मात्र त्यांना सोयी सुविधा नाकारल्या जातात. ही परिस्थिती बदलायची असेल तर जातनिहाय जनगणना करावी लागेल, असं गांधी म्हणाले. प्रत्येक समुदायाच्या संख्येनुसार त्यांची भागीदारी सुनिश्चित केली जाईल, आरक्षणाची ५० टक्क्याची मर्यादा काढून टाकली जाईल, शेतकऱ्यांचं तीन लाखापर्यंतचं कर्ज माफ केलं जाईल, महालक्ष्मी योजने अंतर्गत महिलांना दरमहा तीन हजार रुपये दिले जातील, २५ लाखापर्यंतचा आरोग्य विमा दिला जाईल, अडीच लाख सरकारी नोकऱ्या दिल्या जातील, अशी आश्वासनं राहुल गांधी यांनी दिली. महायुतीच्या काळात राज्यातले उद्योग प्रकल्प दुसऱ्या राज्यात नेण्यात आले असून ५ लाख रोजगार हिसकावले गेल्याचा आरोप राहुल गांधी यांनी केला. राज्यातल्या जनतेला रोजगार मिळावा, अधिकारांचं संरक्षण व्हावं, यासाठी महाविकास आघाडी काम करेल असं ते म्हणाले.

नागपूर/विदर्भातील सभा

महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराचे आता शेवटचे काही दिवस शिल्लक राहिले आहेत. त्यामुळे राजकीय नेत्यांनी प्रचाराचा धडाका लावला आहे.

रोहित पवार

गोंदिया जिल्ह्यातील तिरोडा विधानसभा क्षेत्राचे महाविकास आघाडीचे उमेदवार गुड्डू बोपचे यांच्या प्रचारासाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते रोहित पवार यांनी सभा घेतली. गुड्डू बोपचे यांनी मतदार संघात आपण निवडून येताच आपल्या मानधनाचा **60 %** निधी हा मतदार संघातील वंचित विद्यार्थी आणि आरोग्य सुविधा यांच्या कल्याणासाठी खर्च करणार असल्याचं सांगितलं.

त्यांनतर महाविकास आघाडीचे मध्य नागपूरचे उमेदवार बंटी शेळके यांच्या प्रचारार्थ रेशीमबाग येथील केशवद्वार समोर आयोजित करण्यात आलेल्या जाहीर सभेला

रोहित पवार यांनी संबोधित केलं. लोकशाही आणि संविधानाची ताकत पैश्यापेक्षा जास्त आहे असं ते यावेळी म्हणाले.

महायुती सरकारमधील पक्षांना आणि त्यांच्या नेत्यांना राज्यातील नागरिकांपेक्षा स्वतःचा विकास करण्यात रस आहे. त्यामुळे राज्यातील तरुणाई अंमली पदार्थाच्या आहारी गेली असल्याचा आरोप पवार यांनी केला. निष्क्रीय गृहमंत्र्यांमुळेच देशात 'क्राईम कॅपिटल' म्हणून नागपूर शहराची बदनामी होत असल्याची टीका त्यांनी केली. नागपूर दक्षिण पश्चिम मतदार संघातील महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार प्रफुल्ल गुडधे यांच्या समर्थनात सभेत पवार बोलत होते.

नाना पटोले

महायुतीच्या सरकारनं महाराष्ट्र विकायला काढला आहे. राज्याचे मंत्री आता आपण कधीच गरीब होणार नाहीत असा दावा करीत असल्याचं आमदार नाना पटोले म्हणाले. आज नागपुरात नाना पटोले यांनी प्रसार माध्यमांशी संवाद साधला, त्यावेळी ते बोलत होते.

मोहन यादव

भाजप नेते आणि मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव यांची आज अमरावती जिल्ह्यातील चुरणी इथे सभा आयोजिण्यात आली होती. त्यानंतर त्यांच्या चांदूरबाजार आणि अचलपूर इथं सभा नियोजित आहेत. भाजप सरकारने विविध कल्याणकारी योजनांद्वारे गरीब शेतकरी आणि महिलांच्या कल्याणासाठी महत्वाची पावले उचलली आहे. प्रत्येक नागरिकाला सक्षम बनवण्यासाठी भाजप सरकार काम करीत आहे असं ते सभेत म्हणाले. तर भाजपचं ध्येय केवळ आर्थिक विकास नाही तर प्रत्येक व्यक्तीच्या जीवनमानात सुधारणा करणे आहे असं प्रतिपादन यादव यांनी काल कामठी येथील जयस्तंभ चौकात कामठी-मौदा विधानसभा मतदारसंघाचे भाजपा-महायुतीचे अधिकृत उमेदवार चंद्रशेखर बावनकुळे यांच्या प्रचार सभेत केलं.

सत्यपाल सिंग

भाजपच्या नेतृत्वात देशातील **80** टक्के नक्षलवाद हा संपला असून जातीय दंग्याच प्रमाण कमी आहे असे पोलीस सेवेतील माजी अधिकारी आणि माजी केंद्रीय मंत्री सत्यपाल सिंग यांनी नागपूर भाजपा कार्यालयात आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत सांगितलं. यावेळी त्यांनी महाराष्ट्रात कायदा आणि सुव्यवस्थेच्या बाबतीत करण्यात आलेल्या सुधारणांबाबत माहिती दिली.

तुषार भारतीय

कष्टकरी आणि श्रमजीवी वर्गाचे प्रश्न आणि समस्यांची आपल्याला जाणीव आहे. त्यांच्या या प्रश्नांच्या सोडवणुकीकरीता कटीबद्ध असल्याचं बडनेरा मतदार संघातून अपक्ष उमेदवार तुषार भारतीय यांनी सांगितलं. प्रचार फेरी दरम्यान ते बोलत होते.

यशोमती ठाकूर

निवडून येण्यासाठी जनतेचं काम करावं लागतं. जनतेचा विश्वास संपादन करणे ही सहज सोपी गोष्ट नाही. परंतु या निवडणुकीत विरोधक षडयंत्र करून मतदारांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करतील. त्यांचा हा डाव हाणून पाडा आणि सत्याची साथ द्या असं आवाहन यशोमती ठाकूर यांनी प्रचार सभेत उपस्थित नागरिकांना केलं. तिवसा मतदार संघातील विविध गावात प्रचार दौरा काढून महाविकास आघाडीच्या उमेदवार ठाकूर या नागरिकांशी संवाद साधत आहे. आज मोर्शी तालुक्यातील विविध गावांना भेटी देऊन यशोमती ठाकूर यांच्या प्रचारार्थ पदयात्रा काढण्यात आली.

चंद्रशेखर आझाद

दरम्यान आजाद समाज पार्टी - काशीराम गट-या पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष खासदार चंद्रशेखर आझाद आज निवडणूक प्रचारार्थ विदर्भाच्या दौऱ्यावर असून ते मोर्शी, अमरावती आणि अचलपूर इथल्या उमेदवारांसाठी देखील प्रचार सभा घेत आहेत.

कन्हैया कुमार

काँग्रेसचे प्रभारी कन्हैया कुमार यांची आज उत्तर नागपूरातील कांजी हाऊस इथं प्रचार सभा होणार आहे. संध्याकाळी सात वाजता या प्रचार सभेचे आयोजन करण्यात आले आहे. उत्तर नागपूरचे महाविकास आघाडीचे उमेदवार डॉक्टर नितीन राऊत यांच्या प्रचारार्थ ते सभा घेतील.

पंडित जवाहरलाल नेहरु जयंती

स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांची जयंती आज सर्व शाळांमधून बाल दिन म्हणून साजरी करण्यात येत आहे. त्यानिमित्त अनेक ठिकाणी विविधांगी कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी माजी पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांना त्यांच्या जयंतीनिमित्त समाजमाध्यमावरील संदेशात आदरांजली वाहिली आहे. महाराष्ट्राचे राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यांनी देखील मुंबईत राजभवन इथं पंडित नेहरुंच्या प्रतिमेला पुष्पांजली अर्पण करुन अभिवादन केलं. अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेच्या स्वच्छता निरीक्षक पदविका, फायरमन अभ्यासक्रम आणि स्थानिक स्वराज्य संस्था पदविकेच्या विद्यार्थ्यानी नेहरू जयंती निमित्त रक्तदान शिबिराचं आयोजन करण्यात आलं होत.

गृह मतदानाची सोय

भारत निवडणूक आयोगाने 85 वर्षांवरील मतदार तसेच 40 टक्क्यांपेक्षा जास्त दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र असलेल्या मतदारांना आपल्या मतदानाचा हक्क बजावता यावा यासाठी गृह मतदानाची सोय उपलब्ध करून दिली आहे. आज आणि उद्या अर्थात 14 आणि 15 नोव्हेंबर या कालावधीत जिल्ह्यातील बारा विधानसभा मतदारसंघातील मतदार गृहमतदानाचा हक्क बजावणार आहेत. यात ग्रामीण आणि शहरी विधानसभा मतदारसंघातील एकूण ३ हजार ४३७ मतदार गृह मतदान करणार आहेत. जिल्हा प्रशासनातर्फे इच्छुक मतदारांकडून नमुना 12-डी भरून घेण्यात आला आहे. राजकीय पक्षांच्या अधिकृत प्रतिनिधींनाही गोपनीयतेचे निकष आणि मतदान प्रक्रियेच्या नियमावलीनुसार गृह मतदानावेळी हजर राहता येईल. गृहमतदानाच्या संपूर्ण प्रक्रियेदरम्यान मतदानाची व्हिडिओग्राफी करण्यात येत आहे. कुठल्याही प्रकारे

मतदानाच्या गोपनीयतेचा भंग होणार नाही, याची आत्यंतिक काळजी घेण्याच्या सूचना संबंधित अधिकारी आणि कर्मचा-यांना देण्यात आल्या असल्याचं जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ.विपीन इटनकर यांनी सांगितलं.

नो युवर पोलिंग स्टेशन

प्रशासनातर्फे बीएलओ अर्थात मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांमार्फत नागरिकांच्या घरापर्यंत पोहचून 'मतदार चिठ्ठी'चे वाटप करण्यात येत आहे. या मतदार चिठ्ठीद्वारे आपले नाव मतदार यादीत असल्याची खात्री करता येते तसेच मतदान केंद्र कुठे आहे याचीही माहिती मिळते.

आढावा विधानसभा मतदारसंघांचा'

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं 'आढावा विधानसभा मतदारसंघांचा' हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी सात वाजून १० मिनिटांनी आकाशवाणीवरुन प्रसारित होत आहे. या कार्यक्रमात आज सोलापूर जिल्ह्यातल्या विधानसभा मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

*****